॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २८ ( ) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ भारोत्तोलन स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला सुवर्ण व कास्य पदक प्राप्त करुन देणाऱ्या खेळाडूंचा सत्कार कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

कालीकत विद्यापीठ, कालीकत (केरळ) येथे झालेल्या स्पर्धेत विद्यापीठाकडून खेळताना ५५ किलो वजन गटात प्रशांत कोळी (धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर) या विद्यार्थ्याने सुवर्ण पदक प्राप्त केले. तसेच ६१ किलो वजन गटात गोविंदा महाजन (श्री.व्ही.एस.नाईक महाविद्यालय, रावेर) याने कास्य पदक प्राप्त केले. विशेष बाब म्हणजे प्रशांत कोळी याला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चा अखिल भारतीय आंतर विद्यापीठ भारोत्तोलन स्पर्धेचा सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार प्राप्त झाला. या स्पर्धेत एकूण ९३४ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या विशेष नैपुण्याबद्दल व यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते खेळाडूंचा गौरव करण्यात आला. तसेच संघ प्रशिक्षक डॉ.गोविंद मारतळे व संघ व्यवस्थापक डॉ.मुकेश पवार यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील, सहायक क्रीडा संचालक आर.ए.पाटील, प्रा.किशोर पाठक, ललित काटकर उपस्थित होते.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 28 नोव्हेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी